पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे सातारा छत्रपती संभाजीनगर शहर.
दुरध्वनी क्रंमाक : 0240-2240565.
ई-मेल :ps.satara.abad@mahapolice.gov.in

# प्रेसनोट

## सेट्रींग कामाचे लोखंडी साहीत्य चोरी करणा-या टोळीचा सातारा पोलीसांनी केला पर्दाफाश

दिनांक 14/05/2024 रोजी पोलीस ठाणे सातारा येथे फिर्यादी नामे 1) पुरुषोत्तम लक्ष्मण सरोदे वय 41 वर्षे व्यवसाय ठेकेदार, रा. प्लॉट नं. 49, सिध्दीविनायक सोसायटी, गोलवाडी, लिकरोड, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर यांनी फिर्याद दिली की, दिनांक 13/05/202 रोजी रात्री 11.30 वाजेच्या सुमारास ते दिनांक 14/05/2024 रोजीचे सकाळी 05.00 वाजेच्या सुमारास त्यांचे रुपये 40,000/- किमतीचे जुने बांधकाम साहीत्य एकुण 88 जुने लोखंडी चॅनल हे कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेले आहे त्यावरुन गु.र.नं. 219/2024 कलम 379 भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल झाला. तसेच फिर्यादी नामे 2) मनोज सर्जेराव तिडके, वय 46 वर्षे व्यवसाय रियल ईस्टेट रा. एन-9, संत ज्ञानेश्वर नगर, सिडको,छत्रपती संभाजीनगर 3) मानसुन राजकुमार सवाईवाला वय 24 वर्षे व्यवसाय व्यापार (सिव्हील कॉन्ट्रक्टर ) रा. प्लॉट नं. S-1 आनंद इनक्लेव्ह संमीत्र कॉलनी, निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर यांचे ही बांधकामाचे लोखंडी सेट्रींगचे साहीत्य चोरी पोलीस स्टेशन सातारा येथे अज्ञात चोरा विरुध्द गुन्हा दाखल आहे.

दिनांक 04/09/2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री. संग्राम ताटे यांना गुप्तबातमीदारामार्फत खात्रीलायक बातमी मिळाली की, बांधकामाचे साहीत्य चोरणारे संशयीत इसम हे ए.एस क्लब या चौकात चोरी करणयासाठी टाटा छोटा हत्ती वाहनासह चोरी करण्याच्या इराद्याने उभे आहेत अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने विशेष पथकाचे पोउपनि भंडारे हे त्यांचे पथकासह ए.एस.क्लब चौकात जाऊन तेथे बातमीतील वर्णनाप्रमाणे उभे असलेल्या संशयीत इसमांना त्यांचेकडील टाटा कंपनीचे छोटा हत्ती सह ताब्यात घेऊन त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव 1) **तुषार संतोष दाभाडे वय 21 वर्षे रा. कमळापुर, वाळुज, छत्रपती** संभाजीनगर व दोन विधीसंघर्ष बालक असे असल्याचे सांगीतले. त्यांना विश्वासात घेऊन चोरी झालेल्या बांधकामाचे साहीत्या बाबत विचारपुस केली असता त्यांनी सदरची चोरी केल्याची गुन्ह्याची कबुली देऊन सांगीतले की आम्ही व आमचा साथीदार रामदास खाटोड रा. कमळापुर याचेसह बांधकामाचे साहीत्याची आम्ही दिवसा रेकी करत असतो व रात्रीच्या वेळी आम्ही आमच्या जवळील छोटा हत्ती मध्ये बांधकामाचे साहीत्य टाकुन चोरी करत असल्याचे सांगीतले त्यावरुन सदर आरोपी तुषार दाभाडे यास अटक करुन पोलीस स्टेशन सातारा तपास करीत आहेत.

आरोपी तुषार दाभाडे याचेकडून वरील गुन्ह्यातील गेलामालापैकी रुपये 2,61,930/- किं.चे बांधकामाचे साहीत्य ज्यामध्ये लोखंडी प्रॉप्स, लोखंडी सळया व लोखंडी चॅनल असे गुन्ह्यात वापरलेल्या टाटा कंपनीचे छोटा हत्ती क्रं. एम.एच. 08 W -5613 वाहनासह हस्तगत केला आहे. तसेच अटक आरोपीचा साथीदार **रामदास खाटोड** याचा शोध घेत असुन तो मिळुन आल्यास आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त मा. श्री. प्रविण पवार, पोलीस उप आयुक्त परिमंडळ 2 मा. श्री. नवनित कॉवत, सहाय्यक पोलीस आयुक्त, उस्मानपुरा विभागाचे मा. श्री. डॉ. रणजीत पाटील, सातारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. संग्राम ताटे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि अमोल सोनवणे, नंदकुमार भंडारे, सफौ अनिलकुमार सातदिवे, पोह मनोज अकोले, दिगंबर राटोड, रज्जाक शेख, जगदीश खंडाळकर, रविंद्र राऊत, पोअं/दीपक शिंदे, पुरुषोत्तम दायमा , अविनाश कवाळे वंसत भावे यांनी केली आहे.

----//---

**( पोलीस निरीक्षक )**
**पोलीस स्टेशन सातारा, छत्रपती संभाजीनगर**

Scanned with OKEN Scanner